तरुण भारत
गुरुवार, २६ सप्टेंबर २०२४

# विद्यार्थ्यांनी योजनांचा लाभ घ्यावा

## इंद्रदीप ऑटोचे मॅनेजिंग पार्टनर देवेंद्र दिवाण यांचे आवाहन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

नाविन्याची क्षमता अभियंत्यांनी समजून घेतली पाहिजे. सर्वच क्षेत्रातील घडामोडी जाणून काळाचा वेध घेतला पाहिजे. नाविन्यपूर्ण उत्पादनांचा विकास करण्यासाठी उपलब्ध असणाऱ्या सर्व योजनांचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन इंद्रदीप ऑटोचे मॅनेजिंग पार्टनर देवेंद्र दिवाण यांनी केले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ इंजीनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीमध्ये प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या 'स्वागत समारंभ' प्रसंगी दिवाण बोलत होते. सामाजिक बांधिलकी जपताना इन्स्टिट्यूटतर्फे प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या ६०० हून अधिक विद्यार्थ्यांना रोप यावेळी भेट देण्यात आले.

संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे म्हणाले, 'इन्स्टिट्यूटमधील विद्यार्थी देश परदेशामध्ये उच्च शिक्षण घेत आहेत. व्यवसायाबरोबरच वेगवेगळया जबाबदाऱ्या पार पाडत आहेत. मानवी मूल्यांसह अभियंत्याने तांत्रिक प्रगती साधली पाहिजे. रोजगार निर्मिती करणारा अभियंता ही काळाची गरज असून कामातील उत्कृष्टता हाच नव्या युगाचा मंत्र आहे. विद्यार्थ्यांना सर्व प्रकारचे सहकार्य करण्यासाठी संस्था अखंड प्रयत्नशील राहील.



**कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमधील स्वागत समारंभात विद्यार्थ्यांचे स्वागत करताना देवेंद्र दिवाण, डॉ. आर. आर. कुंभार. सोबत संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्रा. विरेन भिर्डी आदी.**

संस्थेच्या व्यावसायिक शिक्षण समूहाचे संचालक प्रा. विरेन भिर्डी यांनी प्रास्ताविक केले. यामध्ये शासनाच्या विविध शिष्यवृत्ती, परीक्षा योजना, विविध अधिविभाग, इन्स्टिट्यूटद्वारे राबविले जाणारे उपक्रम, सुविधा यांची माहिती तसेच गुणवत्तापूर्ण विद्यार्थी आणि दुर्बल घटक यांचेसाठी संस्थेतर्फे दिल्या जाणाऱ्या संस्थास्तरीय शिष्यवृत्तींची माहिती यावेळी दिली.

संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे यांनी विद्यार्थ्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

सूत्रसंचालन प्रा. अशोक कोळेकर, प्रा. आरती चव्हाण यांनी केले. प्रा. सुदर्शन महाडिक यांनी आभार मानले. यावेळी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, सावित्रीबाई फुले कॉलेज ऑफ नर्सिंगचे प्राचार्य डॉ. विशाल पोवार, अमित आव्हाड, प्रा. रोहन पाटील, प्रा. हेमंत शिंदे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

26/09/24

26.9.24

हॅलो प्रभात दि. 26/9/2024

# विवेकानंदच्या छात्रांची दिल्ली कॅम्पमध्ये निवड



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

विवेकानंद महाविद्यालयातील एनसीसी विभागातील खालील तीन छात्रांची दिल्ली येथील थल सैनिक कॅम्पसाठी निवड झाली होती. यामध्ये ज्युनिअर अंडर ऑफिसर सेला रेगे, बी.एस्सी.बायोटेक भाग ३ हिने हेल्थ-हायजिन व टेंट पिचिंग या इव्हेंटमध्ये सहभागी झाली होती. सेला रेगे हिला टेंट पिचिंग या इव्हेंटमध्ये सुवर्णपदक मिळाले. तसेच सिनिअर अंडर ऑफिसर चेतन पवार , बी.कॉम.भाग ३ व सार्जण्ट सार्थक कुलकर्णी १२ वी आर्टस याची फफायरींग इव्हेंट साठी निवड झाली होती. वरील तीनही छात्र थल सैनिक कॅम्प दिल्ली यशस्वीरित्या पूर्ण करुन परत आले. याबद्दल त्यांचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या यशाबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य मा. अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी मा.प्राचार्या सौ शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी अभिनंदन केले. वरील छात्रांना ५ महाराष्ट्र बटालियनचे कर्नल मानस दीक्षित, कर्नल सुहास काळे, ६ महाराष्ट्र बटालियनचे कर्नल संधान मिश्रा, कॅप्टन सुनीता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले. यावेळी प्रबंधक श्री. रघुनाथ जोग उपस्थित होते.

26/09/24

26-9-2024